# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK

दिंडोरी रोड,म्हसरुळ,नाशिक-४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik-422004

Tel:(0253) 25392228/230 (UG), 25392232 (PG), Fax(0253)2539231/33

Student Helpline:0253-2539111/6659111/100

Website: www.muhs.ac.in, E-mail: pgeligibility_allied@muhs.ac.in

**डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ**
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),डी.एन.बी, एल.एल.बी.
**कुलसचिव**

**Dr. Rajendra Shivaji Bangal**
M.B.B.S, M.D.( Forensic Medicine), D.N.B, L.L.B.
**Registrar**


जा.क्र.मआविवि/सी.५/एमएस्सी(न)/१०४८/२०२३ — दि.२६/०९/२०२३

**नोंदणी व पात्रता सुधारित परिपत्रक क्र.३७/२०२३**

**प्रथम वर्ष पदव्युत्तर पदवी एम.एस्सी.(नर्सिंग) अभ्यासक्रम**

(M.Sc Nursing Course)

प्रति,
**मा. अधिष्ठाता/प्राचार्य/संचालक,**
विद्यापीठाशी संलग्नित पदव्युत्तर पदवी
एम.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमाची महाविद्यालये.

**विषय :** **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात प्रथम वर्ष पदव्युत्तर पदवी एम.एस्सी.(नर्सिंग) अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या नोंदणी व प्रवेश पात्रते बाबत...**

**संदर्भ :** १) विद्यापीठ परिपत्रक क्र.२८/२०२३ दि.०१/०९/२०२३
२) भारतीय परिचर्या परिषद,नवी दिल्ली यांचे पत्र क्र. 1-6/LT/2023-INC Dated 22/09/2023

महोदय/महोदया,

१) उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भाच्या आधारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये पदव्युत्तर पदवी एम.एस्सी.(नर्सिंग) अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांचे नोंदणी व पात्रता प्रस्ताव सादर करण्याकरीता संदर्भ क्र. ०१ अन्वये अनुषंगिक बाबी, प्रस्ताव सादर करण्याचे वेळापत्रक प्रसिध्द करण्यात आले होते तद्नुषंगाने प्रवेश बंदचा अंतिम दिनांक **३०/०९/२०२३** असा प्रसिध्द् करण्यात आला होता. तथापि संदर्भ क्र.०२ अन्वये प्राप्त निर्देशानुसार प्रवेश बंदचा सुधारित अंतिम दिनांक **३१/१०/२०२३** असा नव्याने प्रसिध्द् करण्यात आला आहे. सदर प्रवेश बंद दिनांकानंतर रिक्त जागेवर विद्यार्थी प्रवेशित करता येणार नाही. प्रवेश बंद दिनांकानंतर रिक्त जागा कायम रिक्त समजण्यात येईल.

२) महाविद्यालयाने विद्यापीठाचे सलंग्निकरण घेऊनच महाविद्यालयात विद्यार्थी प्रवेशित करावेत. सलंग्निकरणाअभावी महाविद्यालयाने केलेले विद्यार्थ्यांचे प्रवेश विद्यापीठाव्दारे नोंदणी व पात्रतेसाठी ग्राहय धरले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

३) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्नित एम. एस्सी.(नर्सिंग) अभ्यासक्रमास प्रवेश पात्रतेच्या सर्व निकषांची खातरजमा केल्यानंतर, प्रवेशित विद्यार्थ्यांचे मुळ प्रमाणपत्रे व साक्षांकित प्रतींची पुर्तता करुनच नोंदणी व पात्रता प्रस्ताव सादर करण्यात यावेत.

Maharashtra University of Health Sciences * Nashik * MUHS